FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154199

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

INSPECTOR OF ... ANTI-CORRUPTION ... MUMBAI — सत्यमेव जयते

1. राज्य महाराष्ट्र ,जिल्हा मुंबई , पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई , पहिली खबर क्र. 40 , वर्ष 2022 , दिनांक 01/11/22
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार , तारीख पासून 31/10/22 , वेळ 11.30 वा. तारीख पर्यंत 01/11/22 , वेळ 15.10 वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 31/10/2022 , वेळ 11.30 वा.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 49 , तारीख 01/11/22 , वेळ 23.40 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 40 km चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ठिकाणाचे नंबर गल्ली रस्त्याचे नाव
मनपा पी/दक्षिण वॉर्ड, तळमजला, आरोग्य विभाग, विवाह प्रमाणपत्र कार्यालय, सिटी सेंटर मॉल जवळ, गोरेगाव (प.), मुंबई 104
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station . Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name प्रणाली रघुनाथ राऊळ, रा.ठी. 1/12A, श्री विवेकानंद को.ऑ. सो.सा. सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू) 421201
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रघुनाथ राऊळ
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 24 वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9619354845
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु , जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, If necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

रविंद्र वामन नाईक, वय 57 वर्षे, पद - लिपिक, पी/साऊथ वॉर्ड, गोरेगाव मुंबई मनपा
रा.ठी. A/202, ठक्कर अपार्टमेंट अशोकवन, बोरीवली S.T. डेपोजवळ, बोरीवली (पू.) मुंबई 66

Y.P.R.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

तक्रारदार प्रणाली रघुनाथ राऊळ यांची फिर्याद ही स्वतंत्र कागदावर टंकलिखित केली असून तीच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(तुषार साळुंखे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्यादीची सही

P.R.Rawool
(प्रणाली रघुनाथ राऊळ)

फिर्याद दिनांक – ०१/११/२०२२.

मी कुमारी प्रणाली रघुनाथ राउळ, वय २४ वर्षे, धंदा – वकीली शिक्षण, रा.ठी. १/१२A श्री विवेकानंद को. ऑ.सोसायटी, सारस्वत कॉलनी, डोंबीवली पुर्व, पिन क्र.४२१२०१ मो.क्र. ९६१९३५४८४५.

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटुंबासह राहावयास आहे. मी सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज वडाळा येथे वकीलीच्या ३ ऱ्या वर्षामध्ये शिक्षण घेत असुन त्याचबरोबर वकीलीच्या कोर्टातील कामकाजाबद्दल माहिती मिळावी यासाठी मी ॲड. श्रीमती पुर्वी शहा यांचेकडे शिकाऊ उमेदवार म्हणुन मागील ४ महिन्यापासुन ॲड. श्रीमती पुर्वी शहा यांची मदतनीस म्हणुन काम करत आहे.

ॲड. श्रीमती पुर्वी शहा यांचेकडे अशील श्रीमती आकांक्षा अग्रवाल यांनी त्यांचे लग्नाचे नोंदणी प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. पुर्वी शहा यांचेमार्फत ऑनलाईन फॉर्म दि. २०/०८/२०२२ रोजी भरला होता व त्यासाठी आवश्यक कायदेशीर ऑनलाईन फी भरण्यात आली होती व अशिल श्रीमती अग्रवाल व त्यांचे पती श्री शोभित गुप्ता हे साक्षीदारांसह नोंदणी कार्यालयात हजर राहुन तेथील कायदेशीर प्रक्रीया ॲड. पुर्वी शहा यांचे सल्ल्याने पुर्ण केली होती.

त्यानंतर सदर अशिलाचे लग्नाचे नोंदणी प्रमाणपत्र घेण्यासाठी ॲड. पुर्वी शहा यांनी मला प्राधिकार पत्र दिले होते. म्हणुन त्याबाबतचे कागदपत्र घेवुन मी दि. १७/१०/२०२२ रोजी पी/साऊथ वॉर्ड, बी.एम.सी. ऑफिस गोरेगाव (प) या कार्यालयात जावुन क्लर्क श्री नाईक यांची भेट घेतली होती. तेव्हा नाईक यांनी मला काही कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यास सांगितले व हाताच्या बोटांनी इशारा करुन 'पैसे नाही दिलेत तर तुमचे काम पुर्ण होणार नाही' याची मला जाणीव करुन दिली. तेव्हा माझ्या लक्षात आले की श्री नाईक हे माझेकडे लाचेची मागणी करत आहेत.

त्यानंतर मी श्री नाईक यांनी सांगितलेप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेले नोंदणी प्रमाणपत्राची प्रिंट काढुन त्यावर विवाह नोंदणी कार्यालयाचा शिक्का मारुन घेण्यासाठी पुन्हा दि. २७/१०/२०२२ रोजी श्री नाईक यांना जाऊन भेटले व प्रमाणपत्रावर कार्यालयाचा शिक्का मारुन देण्याची विनंती केली. तेव्हा श्री नाईक यांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्रावर कार्यालयाचा शिक्का मारुन देण्यासाठी १०००/– रुपये इतक्या लाचेची मागणी केली. परंतु माझी श्री नाईक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी ॲड पुर्वी शहा यांच्या सल्ल्याने दि. ३१/१०/२०२२ रोजी प्रत्यक्ष लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई येथे येवुन लेखी तक्रार दिली.

माझ्या तक्रारीनुसार सपोआ श्रीमती वैद्य मॅडम, पोनि श्री साळुंखे यांनी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरु करुन ०२ पंचाच्या समक्ष श्री नाईक यांचे विरुध्द लाचेच्या मागणीविरुध्द प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दि. ३१/१०/२०२२ रोजी सुमारे ०३.३० वा. आम्ही लाप्रवि कार्यालयातुन निघुन श्री नाईक यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. सदर कार्यालयाच्या आसपास शासकिय गाडी थांबवुन, माझ्या ड्रेसच्या आतमध्ये व्हाईस रेकॉर्डर लावुन मी व पंच श्रीमती रोकडे असे सुमारे ०४.३० वा. श्री नाईक यांना भेटावयास त्यांचे कार्यालयात गेलो. तेव्हा श्री नाईक मला म्हणाले कि, 'तुम्ही माझ्या विरुध्द माझ्या वरिष्ठांकडे तक्रार केलीत ना, मग आता तुम्ही प्रमाणपत्रावर शिक्के घ्यायला क्लायंटलाच घेवुन या'. म्हणुन आम्ही पुन्हा शासकिय वाहना जवळ परत आलो.

त्यानंतर वैद्य मॅडम व साळुंखे सर यांच्या सांगण्यानुसार मी व पंच श्रीमती रोकडे असे आम्ही पुन्हा ०४.४५ वा. च्या सुमारास श्री नाईक यांना भेटायला गेलो तेव्हा मी श्री नाईक यांची माफी मागुन माझे क्लायंट इथे येवु शकत नसल्याने प्रमाणपत्रावर शिक्के मारुन देण्याची विनंती केली. त्यावेळेस श्री नाईक यांनी मला क्लायंटचे आणखी एकेक फोटो व ॲड. पुर्वी शहा यांचे कार्ड देण्यास सांगितले. तेव्हा मी श्री नाईक यांना क्लायंटचे फोटो लगेच घेवुन येते असे सांगितले व पुन्हा शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी पुन्हा वैद्य मॅडम व साळुंखे सर यांच्याशी चर्चा करुन त्यांचे सांगण्यानुसार पुन्हा मी व पंच श्रीमती रोकडे असे आम्ही सुमार ०५.१५ श्री नाईक यांना भेटायला त्यांचे कार्यालयात गेलो. परंतु श्री नाईक हे कार्यालयात नसल्याने आम्ही थोडा वेळ त्यांची वाट बघितली. मात्र श्री नाईक हे न आल्याने आम्ही ०५.४५ वा. च्या सुमारास शासकिय वाहनाजवळ परत आलो तेव्हा वैद्य मॅडम व साळुंखे सर यांच्याशी चर्चा करुन आता कार्यालयीन

Scanned with OKEN Scanner

कामकाजाची वेळ संपल्याने श्री नाईक हे भेटण्याची शक्यता कमी असल्याचे गृहीत धरुन पडताळणीची कारवाई तुर्तास स्थगीत करुन पुन्हा दुसऱ्या दिवशी पडताळणी करण्याचे ठरवण्यात आले.

त्यानुसार मी दि. ०१/११/२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. चे सुमारास मी लाप्रवि कार्यालय मुंबई येथे पोहोचले. त्यानंतर दुपारी ०१.०० वा.च्या सुमारास आम्ही सर्वजण श्री नाईक यांचे कार्यालयाकडे शासकीय वाहनाने रवाना झालो. सदर कार्यालयाच्या आसपास शासकिय गाडी थांबवुन, माझ्या ड्रेसच्या आतमध्ये व्हाईस रेकॉर्डर लावुन मी व पंच श्रीमती रोकडे असे दुपारी ०२.१५ वा. च्या सुमारास श्री नाईक यांना भेटावयास त्यांचे कार्यालयात गेलो. तेव्हा श्री नाईक यांनी माझेकडे १०००/— रुपये इतकी लाचेची मागणी केली. त्यावर मी ए.टी.एम. मधुन काढुन पैसे आणुन देते असे सांगुन आम्ही शासकीय वाहनाजवळ परत आलो व वैद्य मॅडम व साळुंखे सर यांना घडलेली हकीगत सांगुन व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकावयास दिले. त्यावरुन वैद्य मॅडम व साळुंखे सर यांची खात्री पटली की श्री नाईक यांनी माझेकडे १०००/— रुपये इतके लाचेची मागणी केली आहे. म्हणुन वैद्य मॅडम व साळुंखे सर यांनी लागलीच पुढील कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करुन माझेकडील ५००/— रुपयाच्या ०२ नोटा लाचेच्या रकमेसाठी म्हणुन ताब्यात घेतल्या व त्याला अॅथ्रासिन पावडर लावुन माझ्या मोबाईलच्या कव्हरमध्ये ठेवुन दिल्या व मला पंच श्रीमती रोकडे यांचेसह श्री नाईक यांना लाचेची रक्कम देण्यासाठी रवाना केले.

त्यानुसार मी व पंच श्रीमती रोकडे असे दुपारी ०३.०० वा. च्या सुमारास श्री नाईक यांच्या कार्यालयात जावुन श्री नाईक यांना भेटुन त्यांचे मागणीप्रमाणे १०००/— रुपये रक्कम आणली असल्याचे सांगितले व लाचेची रक्कम ठेवलेले मोबाईल कव्हर मी श्री नाईक यांचेसमोर धरले असता श्री नाईक यांनी डाव्या हाताने मोबाईलच्या कव्हरमधुन लाचेची रक्कम घेतली व ती उजव्या हातात घेवुन शर्टाच्या छातीवरच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी मला सांगितल्याप्रमाणे डाव्या हाताने ओढणीने चेहरा पुसल्याचा इशारा केला व पंच श्रीमती रोकडे यांनी वैद्य मॅडमना लाचेची रक्कम स्वीकारल्याचा इशारा केला. तेव्हा लागलीच सापळा पथकाने श्री नाईक यांना लाचेच्या रकमेसहीत ताब्यात घेतले व पुढील कायदेशीर कारवाई केली.

अश्या रितीने लिपीक श्री नाईक, विवाह नोंदणी कार्यालय, पी/साऊथ वॉर्ड, बी.एम.सी.ऑफिस गोरेगाव (प) यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी करुन १०००/— रुपये इतक्या लाचेच्या रकमेचा स्वीकार केला असल्याने लिपीक श्री नाईक, विवाह नोंदणी कार्यालय यांचे विरुध्द माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ नुसार कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून बघितला असता तो माझे सांगणेमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(तुषार साळुंखे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

हे लिहुन दिले

P.R.Rawool
(प्रणाली रघुनाथ राऊळ)

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... निरंक

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / Involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी यांचे अशीलांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडे दि. 31/10/22 रोजी 1000/- रुपये लाचेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. 31/10/22 रोजी लाप्रवि मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार अर्ज दिला. नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. 01/11/2022 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडे रु. 1000/- इतक्या लाचेची मागणी केली. आज दि. 1/11/2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे 1000/- इतकी लाचेची रक्कम फिर्यादी यांच्या कडून स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून त्यांच्या विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक तुषार रामचंद्र साळुंखे, लाप्रवि, मुंबई विभाग

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ......
District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

P.R.Rai0001

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb Impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... तुषार साळुंखे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक, लाप्रवि मुंबई
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख......
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner